झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in

क्र. झोपुप्रा/उजि/कार्या-२/टे/डी-२/२०१०/ 2431
11 - OCT 2010

परिपत्रक :- ११६

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे परिशिष्ट-२ पारित करणेबाबतचा कालावधी निश्चित करणेबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिरकणाकडे प्रलंबित असलेल्या योजनांचा आढावा घेतला असता विविध सक्षम प्राधिका-यांकडे ५०० प्रकरणे परिशिष्ट-२ पारित करणेकरीता प्रलंबित असून त्यापैकी २७० प्रकरणे २००३ ते २००८ च्या कालावधीतील असल्याचे दिसून आले. सदरचे परिशिष्ट-२ प्रलंबित असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचेकडे विचारणा केली असता संबंधित संस्था/विकासक/वास्तुविशारद यांचेकडून वेळोवेळी सुचना देऊन सुध्दा पात्रतेबाबतचे पुरावे सक्षम प्राधिका-यांकडे सादर न केल्याने परिशिष्ट-२ पारित करण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आणून दिले यावरुन योजना दाखल झाल्यानंतर व संबंधित संस्था/विकासक/वास्तुविशारद यांचेकडून परिशिष्ट-२ पारित करण्याच्या अनुषंगाने आवश्यक तो प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून आले.

योजना लवकरात लवकर कार्यान्वीत होण्याच्या दृष्टीने परिशिष्ट-२ पारित होणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्था/विकासक/वास्तुविशारद यांना परिशिष्ट-२ पारित करण्याच्या अनुषंगाने निश्चित स्वरुपाची जबाबदारी देणे आवश्यक वाटत असल्याने महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. झोपुयो१०९७/प्रक्र.४५१५/झोपुसू-१, दि. १४/०५/१९९८ मधील अनुक्रमांक ५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये मी खालील प्रमाणे कालावधी निश्चित करीत आहे.

१. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा परिशिष्ट-२ पारित करण्याबाबत प्रस्ताव सक्षम प्राधिका-यांकडे प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्था/विकासक/वास्तुविशारद यांनी १ महिन्याच्या कालावधीत पात्रतेबाबतची व अन्य आवश्यक ती कागदपत्रे संबंधित सक्षम प्राधिका-यांकडे दाखल करुन खालील नमुद कालावधीमध्ये परिशिष्ट-२ सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिरकरणाकडे सादर करणेची कार्यवाही करावी.

| अनु . क्र. | झोपडयांची संख्या | परिशिष्ट -२ पारीत करण्याबाबतचा कालावधी |
|---|---|---|
| १ | ० ते ५०० | ४ महिने |
| २ | ५०० ते १००० | ६ महिने |
| ३ | १००० व त्यावरील | ८ महिने |

२. यामध्ये विलंब झाल्यास संबंधित संस्था/विकासक/वास्तुविशारद यांनी सबळ कारणासह मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचेकडून मुदतवाढीसाठी मान्यता घ्यावी.

३. सदयस्थितीत प्रलंबित परिशिष्ट-२ च्या प्रस्तावामध्ये संस्था/विकासक/वास्तुविशारद यांनी एक माहिन्यात सक्षम प्राधिकारी यांचेकडे कागदपत्रांची पुर्तता करावी व पुढील सहा माहिन्यांत परिशिष्ट-२ दाखला सक्षम प्राधिकारी यांचेकडे प्रमाणित करण्याची कार्यवाही कराण्यात यावी.

४. परिशिष्ट-२ पारित करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्था/विकासक/ वास्तुविशारद यांची राहिल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.